# परिपत्रक

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय**
**प्रशासकीय इमारत ३रा व ४ था मजला**
**सरकारी वसाहत बांद्रा (पुर्व)**
**मुंबई ४०० ०५१.**

परिपत्रक : क्र.पआ/का-३/२५५२/व्यवसाय कर/०७, दिनांक १४/३/०७ जा.क्र. ५८६६

विषय :- मोटार वाहने अधिनियम १९३९ खालील परवाना धारकांना व्यवसाय कर भरण्याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.

संदर्भ :-१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पआ/का-३/२५५२/व्यवसाय कर/८९/२१३५७, दि. २६/१२/८९

२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पआ/का-३/२५५२/व्यवसाय कर/८९/११६, दि. २६/१२/८९

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पआ/का-३/२५५२/व्यवसाय कर/८९/१००६६, दि. ४/८/२०००

४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पआ/का-३/२५५२/व्यवसाय कर/८९/११७२७, दि. ४/८/२०००

५) Do No.MTA 1907/ CR -45 /TRA -3, dt. 8/3/07.

६) Do PFT / Adm - 7/ 2006/31/B - 319, dt. 15/12/2006.

वरील संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाच्या वेळी व्यवसायकर भरल्याचा पुरावा म्हणून व्यवसाय कर विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्याबाबत व्यवसाय कर विभागाला सहकार्य करण्यासाठी प्रशासकीय सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

व्यवसाय कर कायदा १९७६ मध्ये शासनाने १ मे १९९३ रोजी शासन निर्णय क्र. पी एफ टी ३१९२/सी आर १३९/का-३ नुसार परिवहन आयुक्तांना व्यवसाय कर जमा करण्यास्तव प्राधिकृत करणारी तरतुद वगळण्यात आल्यामुळे सबब व्यवसायकर वसुलीची जबाबदारी परिवहन विभागावर नसल्यामुळे या विभागाने निर्गमित केलेली संदर्भ क्र. १,२,३, मागे घेण्यात आली होती.

उपरोल्लेखित संदर्भ क्रमांक ५ च्या शासन पत्रासोबत सादर केलेल्या शासन राजपत्रान्वे अवलोकन करता मोटार वाहन विभागातील परिवहन आयुक्त, विभागीय परिवहन अधिकारी, उप विभागीय परिवहन अधिकारी, सहाय्यक विभागीय परिवहन अधिकारी यांना अनुक्रमे अप्पर व्यवसाय कर आयुक्त, सह आयुक्त,उप आयुक्त आणि व्यवसाय कर अधिकारी म्हणून अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे अधिसुचना निर्गमनाच्या दिनांकापासून व्यवसाय कर वसुलीची जबाबदारी आपल्या विभागाकडे सोपविण्यात

आलेली आहे. या अधिसुचनेची त्वरीत अंमलबजावणी सुरु करावयाची आहे. यादृष्टीने खालील मुद्यावर त्वरीत कार्यवाही सुरु करावी.

१) या निर्णयास स्थानिक वर्तमानपत्रातून पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी.

२) विक्रीकर विभागाकडे संपर्क साधून जिल्हास्तरावर अधिकारी आणि कर्मचारी यांचे व्यवसाय कर कायदयातील तरतूदी, करवसूली आणि दप्तरी नोंदी विषयी प्रशिक्षण त्वरीत आयोजित करण्यात यावे.

३) उपरोक्त संवर्गातील व्यवसाय कर प्रमाणपत्र धारकाची थकबाकीची यादी मागविण्यात यावी तोपर्यंतच्या काळात चालू (२००६ -२००७) वर्षापासून कर वसूल करण्याची कार्यवाही सुरु करावी आणि व्यवसाय प्रमाणपत्र धारकास ३० दिवसाच्या कालावधीमध्ये मागील कराचा पुरावा सादर करण्याची सुचना दयावी.

४) शासकीय महसूल वसुलीच्या दृष्टीने वाहनाचे नविन योग्यता प्रमाणपत्र देतांना व नुतनीकरण करताना, नविन परवाना देतांना व परवाना नुतनीकरण करतांना व्यवसाय कर भरल्याचा पुरावा तपासण्यात यावा.

५) व्यवसाय कर प्रमाणपत्र धारकाने भरलेल्या कराची पावती त्यास विहित नमुन्यात देण्यात यावी.

६) रोज भरणा झालेल्या कराची वेगळी रोख नोंदवही ठेवण्यात यावी.

७) सोबत जोडलेल्या महाराष्ट्र राजपत्रातील फॉर्म XV - A, फॉर्म XV - B, फॉर्म XV - C मध्ये दप्तरी नोंदी ठेवण्यात याव्यात.

८) सदर कराचा भरणा पुढील लेखाशीर्षाखाली करण्यात यावा.

००२८ - उत्पन्न व खर्च या वरील ईतर कर

१०७ - व्यवसाय, व्यापार, आजिविका व सेवायोजन यावरील कर.

००२८००१२ व्यवसाय कर

९) मोटार वाहन कराचे ताळमेळ प्रमाणे व्यवसाय कर भरल्याविषयी दरमहा कोषागारात ताळमेळ करण्यात यावा.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

सोबत :- व्यवसाय कर अधिनियम,त्याखालील अधिसुचनेच्या प्रती.

1) PFT/105/CR 122/Taxation 3 finance dept., dt. 3/11/2006.
2) PFT/Adm - 7/ 2006/31/Order - 2, dt. 17/1/2007.

तात्काळ/महत्वाचे

क्र.पआ/का.१९/व्यवसाय कर/२४५/०७/जा.क्र.

परिवहन आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३रा/४था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
दिनांक - 9 MAY 2007

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (कार्यालय प्रमुख)

विषय - परिवहन विभागातर्फे व्यवसाय कर अधिनियमांच्या नोंद १३ अन्वये करावयाच्या व्यवसाय कर वसूलीबाबत

संदर्भ - विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पीएफटी/एडीएम ७/३१/बी ८० दिनांक १२.४.२००७.

उपरोक्त विषयास अनुसरुन माननीय विक्रीकर आयुक्त यांच्या संदर्भाधीन पत्राची प्रत विक्रीकर विभागाच्या संपर्क कार्यालयांचे पत्ते, त्यांचे दूरध्वनी क्रमांक व कार्यक्षेत्र दर्शविणाऱ्या यादीसह पाठवित आहे. माननीय विक्रीकर आयुक्त यांनी स्वयंस्पष्ट सूचना दिलेल्या आहेत, त्यांची पूर्तता करण्यात यावी व त्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाशी संबंधित उपरोक्त यादीतील संपर्क अधिकाऱ्याशी विचार विनिमय करुन संबंधित अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी व त्याचा अहवाल सात दिवसांत या कार्यालयास पाठविण्यात यावा.

सहपत्र - विक्रीकर आयुक्त यांचे
पत्र व यादी

सही/-
परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) मा.विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरिता.

परिवहन आयुक्तांचे कार्यालय
जावक क्र. 90090
प्रती 1+215
सहपत्र ..................
पाठविल्याचा दिनांक 9 MAY 2007

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

F:\USHA\DIII/488

कालमर्यादा/अति महत्वाचे

महाराष्ट्र शासन

एस.डी.शिंदे

परिवहन आयुक्त

टेलि. नं. ६५१६३३६

फॅक्स :

अ. शा. प. क्र. पआ/का.१९/व्यवसाय कर/२४४/०७ १०५८२

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ३रा व ४था मजला,

डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,

वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

दिनांक 22 MAY 2007

विषय - व्यवसाय कर कायदयाच्या सुरळीत व प्रभावी अंमलबजावणीबाबत कार्यपूर्ती अहवाल सादर करणेबाबत

संदर्भ -१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पआ/का.३/२५५२/व्यवसायकर/०७/ जाक्र. ५८६६ दि. १४.२.२००७

२) या कार्यालयाचे पत्र क्र. पआ/का.३/२५५२/व्यवसाय कर/०७/ जाक्र ९४७२ दिनांक २६.४.२००७.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. पआ/का.१९/व्यवसाय कर/२४२/०७/ जाक्र १००१७ दिनांक ९.५.२००७.

प्रिय श्री.

१. व्यवसाय कर कायदयातील नोंद क्र. २३ अनुसार वाहनांच्या परवानाधारकांकडून व्यवसाय कर वसुलीचे अधिकार दि. ३.११.२००६ पासून शासनाने परिवहन विभागास पारित केल्याचे आपणास विदित आहे. उपरोक्त संदर्भित पत्रान्वये व्यवसाय कराचा कार्यभार हस्तांतरण तसेच व्यवसाय कर वसूली व अंमलबजावणी परिवहन खात्यातर्फे त्वरित सुरु होणेबाबत आपणास योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात आपल्या कार्यालयातर्फे केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल या कार्यालयास अपेक्षित आहे.

३) या संदर्भात मा. प्रधान सचिव(परिवहन) यांच्याकडून विचारणा होत आहे. या संदर्भात विधीमंडळाच्या बैठकीतसुध्दा चर्चा झाली होती.

४) या संदर्भात मा. व्यवसाय कर आयुक्त, श्री. सुनिल सोनी, यांनी जारी केलेले व्यवसाय परिपत्रक क्र. PFT/2006/PT/Adm-7/31/B-101 परिपत्रक क्र. 40 T of 2007 मुंबई दि. १४.५.२००७ ची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडलेली आहे. कृपया सदर व्यवसाय पत्राच्या प्रती काढून आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व वाहतूक संस्थांना वितरीत करावी व आपल्या कार्यालयाच्या माहिती फलकावर लावावी व केलेल्या कार्यवाहीचा कार्यपूर्ती अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५) मोटार वाहन परवाना धारकांकडून व्यवसाय कर वसूलीचे अधिकार पूर्णपणे परिवहन विभागास वर्ग करण्यात आले असल्यामुळे परिणामकारक व्यवसाय कर नोंदणी, कर वसुली व अंमलबजावणी होण्याकरिता मोटार वाहन नोंदणी, हस्तांतरण, योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण तसेच ना हरकत प्रमाणपत्र जारी करतेवेळी तसेच भाडे खरेदी करार नोंद करणे व रद्द करतेवेळी तसेच परवाना नूतनीकरण करतेवेळी व्यवसाय कर कायद्यानुसार नोंदणी करण्यात आली आहे किंवा नाही तसेच व्यवसाय कर भरण्यात आला आहे अथवा नाही याची खातरजमा करण्याची जवाबदारी आपल्यावर राहील व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६) या पत्राव्दारे आपणांस सूचित करण्यात येते की, या संदर्भात ३१.५.२००७ पर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नमुना XV-A, XV-B, XV-C च्या समवेत या कार्यालयास दि. ५.६.२००७ पर्यंत न चुकता पाठविण्याची व्यवस्था करावी जेणेकरुन मा. व्यवसाय कर आयुक्त व मा. प्रधान सचिव (परिवहन) यांना अद्यावत माहिती पुरविणे शक्य होईल.

आपला

(एस. [illegible])

सहपत्र -व्यवसाय कर आयुक्तांचे
व्यवसाय परिपत्रकाची प्रत

प्रती-
श्री. ...............
उप / प्रादेशिक परिवहन अधिकारी
........................

परिवहन आयुक्तांचे कार्यालय
जावक क्र. 9054
प्रती ........ 22 MAY 2007
सहपत्र ........
पाठविल्याचा दिनांक 22 MAY 2007

**अति तात्काळ**

मोटार वाहन परवाना (Permit)
धारकांकडील थकीत व्यवसाय करासाठी सवलत योजना
व्यवसायकर अभय योजना-२००९.

**परिवहन आयुक्त कार्यालय**
प्रशासकिय इमारत, ३रा व ४ था मजला
शासकिय वसाहत, वांद्रे (पुर्व)
मुंबई-४०० ०५१.

परिपत्रक क्रमांक जा.क्र. ७३९४ /पआका/का-१९/व्यकर/अभय योजना-०९/न मुंबई, दि. 3 JUL 2009

**परिपत्रक**

विशेष कार्य अधिकारी, वित्त विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक व्यकर-१००९/प्र.क्र. २३/कराधान-३/मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २९/६/२००९ अन्वये मोटार वाहन परवाना ( Permit ) धारकांकडील थकीत व्यवसायकरासाठी सवलत योजना व्यवसायकर अभय योजना २००९ जाहिर झाली आहे.

सदर शासन निर्णयाची प्रत माहितीकरीता सोबत जोडली आहे.

सदर अभय योजनेचा कालावधी १/७/२००९ ते ३१/१२/२००९ या कालावधीकरीता मर्यादीत आहे.

अभय योजनेच्या अटींबाबत शासन निर्णयाच्या रकाना २ क मध्ये व अभय योजना सवलतींबाबत सदर परिपत्रकाच्या २ ख मध्ये सुचना दिल्या आहेत त्यांचे पालन करावे. अभय योजनेखाली अर्ज करण्याची कार्यपध्दती रकाना क्रमांक २ घ मध्ये दर्शविली आहे. सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या w.w.w. Maharashtra.gov.in या बेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक- २००९०६२९१५३९२८००१ असा आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे व्यवसायकर अभय योजना २००९ अंतर्गत आपल्या कार्यालयातर्फे जास्तीतजास्त प्रसिध्दी देवून जास्तीतजास्त थकबाकी प्रकरणांची वसूलीकरण्यात यावी व प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला व १६ तारखेला प्रगती अहवाल सादर करण्यात यावा. पहिला प्रगती अहवाल दि. १६/७/०९ रोजी अपेक्षित आहे.

अभय योजना अंतर्गत झालेली वसूलीची स्वतंत्र माहिती सादर करण्यात यावी व दरमहा नियमाप्रमाणे पाठविण्यात येणा-या प्रपत्रात या वसुलीचा समावेश असावा.

सहपत्रे - दिनांक २९/६/२००९ चे परिपत्रक.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालये.
सर्व उप प्रादेशिक परिवहन कार्यालये.
सर्व नियंत्रक अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय.
सर्व संबंधित कर्मचारी कार्यासन १९.
परिपत्रक नोंदवही.
प्रत माहितीसाठी रवाना
१) माननीय सचिव गृह विभाग परिवहन, मंत्रालय, मुंबई
२) माननीय विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई.
३) विशेष कार्य अधिकारी कराधान ३ वित्त विभाग मंत्रालय मुंबई

DyTC(I)

**मोटार वाहन परवाना (Permit) धारकांकडील थकीत व्यवसाय करासाठी सवलत योजना- "व्यवसाय कर अभय योजना-२००९"**

परिवहन आयुक्तांचे कार्यालय
आवक R 6765
दि. 2/7/09
नस्ती क्र. 19

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक-व्यकर-१००९/प्रक्र.२३/कराधान-३,
मंत्रालय,मुंबई-४०००३२,
दिनांक: २९ जून २००९

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोक-या यावरील कर अधिनियम, १९७५ (व्यवसायकर कायदा, १९७५) अन्वये व्यवसाय कर भरण्यास पात्र असलेल्या व्यक्ती, संस्था आणि आस्थापना यांनी विहित कालावधीत नांव नोंदणीकरण (Enrollment) करून घेवून व्यवसाय कर भरणे बंधनकारक आहे. नांव नोंदणीकरण करण्यास अथवा देय व्यवसाय कर भरण्यास विलंब झाल्यास उक्त कायदयामध्ये व्याज, दंड, शास्ती आकारण्याची तरतूद आहे. व्यवसाय कर कायद्याच्या अनुसूची एक मधील नोंद क्र.१३ अन्वये मोटार वाहन परवानाधारकांना मोटार वाहनांच्या प्रकारानुसार रु. ७५० ते २५०० व्यवसाय कराचा भरणा करणे आवश्यक असते. साधारणत: मोटार वाहन परवान्यांचे नुतनीकरण करताना व्यवसाय कराचा भरणा करून घेण्यात येतो. याबाबत शासनाच्या निदर्शनास असे आले आहे की, अद्यापही या परवानाधारकांकडे व्यवसाय कराची थकबाकी मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या व्यवसाय कर थकबाकीदारांना त्यांचेकडील थकबाकी भरताना अभय योजनेव्दारे सवलतीची शेवटची संधी देण्याचे मा.वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या वर्ष २००९-१० च्या अर्थसंकल्पिय भाषणात प्रस्तावित केले होते. या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय

२. व्यवसाय कर कायद्याअंतर्गत अनुसूची एक खालील नोंद क्र १३ अन्वये मोटार वाहन परवाना धारक व्यावसायिकांसाठी "व्यवसाय कर अभय योजना-२००९" घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार मोटार वाहन परवानाधारकांकडे प्रलंबित असणा-या वित्तिय वर्ष २००८-०९ पर्यंतच्या व्यवसाय कर भरणासाठी ही अभय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा कालावधी, [illegible] सवलती आणि कार्यपध्दती खालील प्रमाणे असेल

G.R : 9-21 [illegible]

क) अभय योजनेचा कालावधी :-

व्यवसाय कर अभय योजना-२००९ ही दिनांक १ जुलै २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधीसाठी मर्यादित आहे.

ख) अभय योजनेच्या अटी :-

१. मोटारवाहन परवानाधारकांनी व्यवसाय कर कायद्याच्या अनुसूची एक मधील नोंद क्र. १३ अन्वयेच्या एकूण थकबाकी पैकी दिनांक १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७ पर्यंतच्या कालावधीचा व्यवसाय कर संपूर्णपणे भरणे आवश्यक राहील. त्याचबरोबर या कालावधीतील देय व्याज, शास्ती किंवा दंड यांच्या देय रकमेपैकी १०% रक्कम दिनांक ३१/१२/२००९ पर्यंत भरणे आवश्यक आहे.

२. अभय योजनेखालील सवलतीचा लाभ हा दिनांक १ जुलै २००९ रोजीच्या कराच्या थकबाकीसाठी आणि अनुषंगिक व्याज, दंड व शास्ती यासाठी असेल.

३. व्यवसाय कर कायद्याच्या अनुसूची एक मधील नोंद क्र.१३ खालील परवानाधारकांनी एखाद्या कालावधीसाठी व्यवसाय कर आकारणी विरोधात अपील दाखल केले असेल व त्यांना सदर कालावधीसाठी अभय योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल तर असे अपील मागे घेणे बंधनकारक राहील.

४. या योजनेच्या आधारे अर्जदारास कोणत्याही प्रकारच्या परताव्याचा दावा करता येणार नाही किंवा असा परतावा दिला जाणार नाही.

ग) अभय योजनेखालील सवलती :-

वर नमूद केलेल्या अटींची पूर्तता केल्यास अर्जदारास पुढील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

१. दिनांक ३१/३/२००२ पर्यंतच्या सर्व कालावधीसाठी थकीत असलेला व्यवसाय कर, त्यावरील व्याज, दंड आणि शास्तीची संपूर्ण रक्कम माफ करण्यात येईल.

२. दिनांक १/४/२००२ ते ३१/३/२००७ पर्यंतच्या कालावधीसाठीच्या देय करावरील व्याज, दंड, शास्ती यांच्या रकमेच्या ९०% रक्कम माफ करण्यात येईल.

घ) अभय योजनेखाली अर्ज करण्याची कार्यपध्दती :-

या योजनेतील सवलतीचा लाभ घेण्यासाठी मोटार वाहन परवानाधारकाने अभय योजनेच्या कालावधीत संबधित परिवहन अधिका-यांकडे सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज करणे बंधनकारक आहे. अर्जासोबत अभय योजनेप्रमाणे देय कर, व्याज, दंड आणि शास्ती भरल्याचे पुरावे

सादर करणे आवश्यक असेल. तसेच अपिलात असलेल्या कालावधीसाठी भाग योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास अर्जा सोबत अपील मागे घेतल्याचा पुरावा जोडणे आवश्यक राहील.

च) ही योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सर्व अधिकार परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत आहेत. त्यांना हे अधिकार त्यांच्या कार्यक्षेत्रात दुय्यम अधिकाऱ्यांना देण्याचे अधिकारही प्रदान करण्यात येत आहेत.

छ) योजनेतील तरतूदी व अटींबद्दल काही शंका अथवा प्रश्न उपस्थित झाल्यास याबद्दल निर्णय देण्याचा अधिकार परिवहन आयुक्त यांचा राहील.

ज) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०६२९१५३९२८००५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( चित्रा कुलकर्णी )
विशेष कार्य अधिकारी, वित्त विभाग

प्रत:-

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, ८ वा मजला, माझगांव, मुंबई-४०० ०१०
२) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, उपनगरीय प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला, डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, ६ वा मजला, विधान भवन, मुंबई-३२.
१०) निवड नस्ती, कराधान-३.

**अर्जाचा नमुना** **व्यवसाय कर अभय योजना, २००१**

प्रति,

प्रादेशिक परिवहन अधिकारी.

______________

विषय : व्यवसाय कर अभय योजना, २००१ खाली सवलत मिळणेबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक: व्यकर-१००१/प्र.क्र.२३/कराधान-३,

दिनांक : २१ जून, २००१.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये शासनाने जाहीर केलेल्या व्यवसाय कर अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी मी खालील तपशीलासह अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अ) परवानाधारक व्यावसायिकाचे नाव | |
| | ब) पत्ता | |
| २ | मोटार वाहन परवाना (Permit) क्रमांक | |
| ३ | व्यवसायकर कायद्याखालील नावनोंदणी क्रमांक | |
| ४ | थकीत रकमेचे विवरण | |

| अ.क्र | वर्ष | थकीत रक्कम (दिनांक १.६.२००१ ची स्थिती) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मूळ कर | व्याज | शास्ती / दंड | एकूण |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| | एकूण | | | | |

५ अभय योजनेखाली भरण्यात करण्यात आलेली रक्कम

| अ.क्र | वर्ष | कर | व्याज | शास्ती / दंड | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| | एकूण | | | | |

अभय योजनेच्या सर्व अटींची पूर्तता मी केली असून, या योजनेखालील सवलतीचा लाभ देण्यात यावा, ही विनंती

आपला विश्वासू

दिनांक :

ठिकाण

(अर्जदाराची स्वाक्षरी)